# रेशीम कोष दरवृद्धीसाठी प्रक्रियेला प्राधान्य

## एमआरएम युनिटसाठी दोन प्रस्ताव सादर; रामनगरमच्या धर्तीवर आकार देण्याचा प्रयत्न

**संतोष मुंढे**

औरंगाबाद : झपाट्याने होत असलेल्या रेशीम उद्योग विस्ताराला आकार देताना आता रेशीम विभागाने उत्पादित रेशीम कोषावर मराठवाडा किंवा राज्यातच प्रक्रियेला प्राधान्य दिले आहे. त्यासाठी ॲटोमॅटीक रेलिंग युनिट सोबतच मल्टी अँड रेलिंग युनिट व कॉटेज बेसीन युनिट निर्मितीसाठीही प्रयत्न सुरू केले आहेत. एमआरएम व इतर युनिटसाठी येत्या ३० सप्टेंबरपर्यंत रेशीम विभागाकडून प्रस्ताव स्वीकारले जाणार आहेत.

राज्यात यंदा नव्याने जवळपास ७ हजार ८८ एकरवर तुतीची लागवड झाली आहे. त्यातही एकूण तुती लागवडीपैकी सुमारे ५५ टक्के वाटा उचलणाऱ्या मराठवाड्यातील शेतकऱ्यांनी तुती लागवडीत आघाडी आहे. आधीच्या तुती क्षेत्रात नव्याने लागवड झालेल्या ७०८८ एकरची भर पडल्याने राज्यातील तुतीचे क्षेत्र १७ हजार ९०४ एकरांवर पोचले आहे. नव्याने झालेल्या लागवडीत राज्यातील १४३१ गावांत रेशीम पोहचले आहे. त्यामध्ये अमरावती विभागातील ३६२, नागपूर विभागातील २२४, औरंगाबाद विभागातील ५७७ तर पुणे विभागातील २६८ गावांमध्ये रेशीम उद्योग पोहचला आहे.

> केवळ उत्पादनापुरते मर्यादित न राहता उत्पादित कोषावर आपल्याच राज्यात प्रक्रिया, कोषाच्या विक्रीसाठी स्वत:ची बाजारपेठ, त्यामध्ये रामनगरमप्रमाणे स्पर्धात्मक दर मिळावे, यासाठी प्रयत्न सुरू आहेत.
>
> – **दिलीप हाके**, सहायक संचालक रेशीम, औरंगाबाद विभाग.

रेशीमचा विस्तार मोठ्या प्रमाणात होत असला तरी जोवर उत्पादित कोषांवर मराठवाड्यात किंवा महाराष्ट्रातच प्रक्रिया होत नाही तोवर राज्यात प्रायोगिक तत्त्वावर सुरू असलेल्या जालन्यातील रेशीम कोषाच्या बाजारात कोष खरेदीची स्पर्धा निर्माण होणार नाही. त्याशिवार राज्यात रामनगरमप्रमाणे कोषाला दर मिळण्याची शाश्वती नाही. नेमकी हीच बाब हेरून रेशीम विभागाने नुकतेच केंद्रीय रेशीम बोर्ड अध्यक्षांच्या दौऱ्यानंतर महाराष्ट्रात मराठवाड्यात रेशीम कोषावर प्रक्रियेला प्राधान्य देण्यासाठी एमआरएम व कॉटेज बेसीन रेलींग युनिट देण्यासाठी प्रस्ताव मागविणे सुरू केले आहे. येत्या ३० सप्टेबरपर्यंत हे प्रस्ताव स्विकारले जाणार आहेत. त्यानंतर ऑक्टोबरच्या पहिल्या आठवड्यात केंद्रीय पथक सादर प्रस्तावांनुसार प्रत्यक्ष पाहणी करून त्यांचा तांत्रिक अहवाल याला मंजुरात देणाऱ्या पीएमसी समोर ठेवणार आहेत. सादर प्रस्तावाला मंजूर देण्याचे काम २० ऑक्टोबरला पीएमसीच्या बैठकीत होईल. ट्रेनिंग घेऊनच प्रस्ताव सादर करणाऱ्यांच्या प्रस्तावाला युनीट मिळणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली. मराठवाड्यातून एमआरएम युनीटसाठी दोन प्रस्ताव सादर करण्यात आले आहेत. यंदा किमान १३ युनिट देण्याची तयारी रेशीम विभागाने दर्शविली आहे. त्यामुळे या उद्योगात उतरू शकणाऱ्यांना संधी मिळणार आहे.

एकट्या रामनगरमध्ये जवळपास २५०० ॲटोमॅटीक व कॉटेज बेसीन रिलिंग युनीट व चार ॲटोमॅटीक रेलिंग युनिट कार्यरत आहेत. कर्नाटकात जवळपास ११ ॲटोमॅटीक रेलिंग युनिट(एआरएम) कार्यरत आहेत. तुलनेत महाराष्ट्रात केवळ भंडारा व जालना येथे दोनच ठिकाणी ॲटोमॅटीक रेलिंग युनिट कार्यरत आहेत. तिसरे सांगली येथील ॲटोमॅटीक रेलिंग युनिट अजून कार्यान्वित होणे बाकी असल्याची माहिती रेशीम विभागाच्या सूत्रांनी दिली.

## संक्षिप्त

### कपाशीवर कीड-रोगांचा प्रादुर्भाव

**अंबड :** कपाशीचे बोंड फुटण्याअगोदरच किडींचा व रोगांचा प्रचंड प्रादुर्भाव वाढला आहे. शेतकऱ्यांची नगदी पिके व पांढरे सोने म्हणून ओळखल्या जाणाऱ्या कपाशीने शेतकऱ्यांना पुरते भुईसपाट केले आहे. खर्च जास्त, उत्पन्न कवडीमोल यामुळे पुरती भ्रमनिराशा झाली आहे. निसर्गाची अवकृपा झाली. पावसाने चांगलाच दगा दिला आहे. पावसाळा संपत आला तरी कुठेच पावसाने दमदार हजेरी लावल्याचे दिसून येत नाही. यामुळे नदी, नाले, पाझर तलाव पाण्यावाचून पूर्णपणे तहानलेलेच आहेत. विहिरी, कूपनलिकांची पाणीपातळी वाढली नाही. खरिपाच्या उभ्या पिकांची दाणादाण उडाली आहे. कपाशीवर गुलाबी बोंड अळीने थैमान घातले. पावसाने पाठ फिरविल्याने तुरीचे जोमात आलेले पीक कोमात चालले आहे. मूग, उडीद हातचे गेले.

### ऊसतोड कामगारांचे चौसाळ्यात धरणे आंदोलन

**बीड :** ऊसतोड कामगार व वाहतूक कामगार मुकादम, ऊसतोड कामगार संघर्ष समितीच्या वतीने बुधवारी (ता. २६) विविध मागण्यांसाठी तालुक्यातील चौसाळा येथे धरणे आंदोलन करण्यात आले. या वेळी उसतोड कामगारांनी घोषणा देत त्यांचा रोष व्यक्त केला. ऊसतोडणी कामगारांना दरवाढ देणारा नवीन करार करावा, ऊसतोडणीचा दर ४०० रुपये करावा, ऊस वाहतुकीच्या दरात ५० टक्के वाढ करावी, मुकादमांचे कमिशन दर २० टक्के करावे यासह विविध मागण्यांसाठी हे आंदोलन केले. मागण्या मान्य न झाल्यास आंदोलनाचा इशारा या वेळी देण्यात आला.

# डॉ. राकेश अहिरे यांची कृषी महाविद्यालयास भेट

**औरंगाबाद (प्रतिनिधी) :** महात्मा गांधी मिशन संचलित नानासाहेब कदम कृषी महाविद्यालय, गांधेली येथे वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाचे विस्तार विभाग प्रमुख डॉ. राकेश अहिरे यांनी भेट दिली.

ग्रामीण कृषी कार्यानुभव अंतर्गत सातव्या सत्रातील विद्यार्थ्यांचे कृषी कार्यानुभव उपक्रम व विद्यार्थ्यांनी राबविलेल्या विविध शेतकरी उपयोगी उपक्रमाची माहिती कृषिदूतांनी दिली.

कार्यक्रमासाठी गांधेली परिक्षेत्राचे संचालक डॉ. राजेंद्र रेड्डी उपस्थित होते. त्यासह महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ए. के. पांडे, उपप्राचार्य डॉ. एन. एम. मस्के यांनी मार्गदर्शन केले. सूत्रसंचालन प्रा. आर. ए. शेळके यांनी केले. तर प्रा. पी. एम. कदम यांनी आभार मानले.

# घनसावंगीत बंद दाराआड पंचायतराज समितीने घेतला आढावा

**घनसावंगी, जि. औरंगाबाद : (प्रतिनिधी)** पंचायतराज समितीने घनसावंगी पंचायत समिती कार्यालयात बुधवारी (ता. २६) सुमारे दोन तास बंद दरवाजाआड विविध विभागांचा आढावा घेतला.

पंचायतराज समितीचे गटप्रमुख आमदार राहुल बोंद्रे व डॉ. देवराव होळी यांनी घनसावंगी येथे जिल्हा परिषदेच्या वर्ष २०१३ ते १४ च्या लेखापरीक्षा पुनर्विलोकन वार्षिक प्रशासन अहवालाच्या संदर्भात पंचायत समितीच्या सर्व विभागांची व ग्रामपंचायतीशी संबंधित सर्व कामकाजांची पाहणी व चौकशी केली. दरम्यान, लेखापरीक्षक विभागाने नोंदविलेल्या माहितीत काही गंभीर आक्षेप असल्याचे समजते. दरम्यान, पंचायत समितीसमोर विविध मागण्यांबाबत उपोषण करणाऱ्यांच्याही समिती सदस्यांनी भेटी घेतल्या. तसेच प्रश्न तत्काळ सोडविण्याच्या सूचना गटविकास अधिकारी श्रीकृष्ण वेणीकर यांना दिल्या.

सकाळ अॅग्रोवन
आयोजित


गुडवील पॉलिप्लास्ट, लातूर
प्रायोजित
सकाळ अॅग्रोवन संवाद
'अॅग्रोवन' साधणार शेतकऱ्यांशी संवाद
कार्यक्रम वेळापत्रक
रविवार, ३० सप्टेंबर २०१८ रोजी
विषय – ऊस व रब्बी हंगाम पूर्व तयारी
वक्ते – डॉ. व्ही. पी. सूर्यवंशी (विस्तार कृषी विद्यावेत्ता, कृषी विस्तार शिक्षण केंद्र, लातूर)
प्रा. संदिप देशमुख (शास्त्रज्ञ, मांजरा कृषी विज्ञान केंद्र, लातूर)
श्री. सुनिलकुमार उपाध्याय (अध्यक्ष, गुडवील पॉलिप्लास्ट, लातूर)
स्थळ – व्यंकोबा मंदिर (चावडी) गंगापूर, ता. जि. लातूर, वेळ –सायं ७.३० वा.
या मार्गदर्शन मेळाव्याचा आपण व आपल्या शेतकरी मित्रांनी अवश्य लाभ घ्यावा, ही विनंती.

# आर्थिक नुकसानीची २१२ गावांत गाठली पातळी

## लातूर कृषी विभागातील कपाशीची अवस्था; क्रॉपसॅपमधील निरीक्षणात स्पष्ट

**लातूर (प्रतिनिधी) :** लातूर कृषी विभागांतर्गत येत असलेल्या पाचही जिल्ह्यांतील २१२ गावांतील कपाशी पिकावर कीड- रोगांच्या प्रादुर्भावाने आर्थिक नुकसानीची पातळी ओलांडली. अकरा आठवड्यांत क्रॉपसॅपमधील निरीक्षणात हे समोर आल्याची कृषी विभागाने स्पष्ट केले.

लातूर कृषी विभागात यंदाच्या खरिपात २८ लाख ७ हजार हेक्टरवर खरीप पिकांची पेरणी झाली. पेरणी झालेल्या एकूण खरीप पिकांपैकी २ जुलै ते १६ सप्टेंबरदरम्यान अकरा आठवड्यांत कपाशी, सोयाबीन पिकावर कीड- रोगांच्या प्रादुर्भावाचे क्रॉपसॅप अंतर्गत निरीक्षण नोंदविण्यात आले. त्यामध्ये पहिल्या व दुसऱ्या आठवड्यात ९९ गावशिवारांतील कपाशीवरील कीड- रोगाने आर्थिक नुकसानीची पातळी गाठली. तिसऱ्या आठवड्यात ८४, चौथ्या आठवड्यात १७५, पाचव्या आठवड्यात २६१, सहाव्या आठवड्यात ३०३, सातव्या आठवड्यात ३५७, आठव्या आठवड्यात २७६, नवव्या आठवड्यात २९०, दहाव्या आठवड्यात २७५, तर अकराव्या आठवड्यात २१२ गावांत कपाशीवरील कीड- रोगांनी आर्थिक नुकसानीची पातळी गाठली.

या दरम्यान गुलाबी बोंड अळीचा ५७ गावशिवारांत नुकसान पातळी गाठणारा प्रादुर्भाव २७ ऑगस्ट ते २ सप्टेंबरदरम्यान २२१ गावांतील कपाशीच्या क्षेत्रांवर पोचला होता. त्यानंतर त्यामध्ये सातत्याने घट होऊन १७ ते २१ सप्टेंबरदरम्यान ३८ गावांवर हा आर्थिक नुकसानीचा प्रादुर्भाव येऊन पोचला असल्याची माहिती कृषी विभागाच्या वतीने औरंगाबाद येथे पार पडलेल्या विभागीय कृषी संशोधन, सल्लागार समितीच्या बैठकीत देण्यात आली.

औरंगाबाद, जालना व बीड या तीन जिल्ह्यांत यंदा कपाशीची ९ लाख ८३ हजार हेक्टरवर कपाशीची लागवड झाली. या क्षेत्रापैकी ५२ हजार हेक्टरवरील कपाशीवर गुलाबी बोंड अळीचा प्रादुर्भाव झाला. जवळपास ३०७ गावांतील कपाशीवर गुलाबी बोंड अळीचा प्रादुर्भाव झाला. त्यापैकी १३० गावांतील कपाशीतील प्रादुर्भावाने आर्थिक नुकसानीची पातळी ओलांडली होती. गत दोन आठवड्यांत तीनही जिल्ह्यांतील जवळपास १४३ गावांतील कपाशीच्या पिकावर गुलाबी बोंड अळीचा प्रादुर्भाव दिसून आला आहे. त्यामध्ये औरंगाबादमधील १९, जालन्यातील ४५ व बीड जिल्ह्यातील ७९ गावांचा समावेश असल्याची माहिती कृषी विभागाच्या सूत्रांनी दिली.